# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.CIC/अ.क्र.७३६८ /२०२६

श्री .विजय वसंत कुचेकर
1049, नवीन नाना पेठ,
भारत सिनेमा समोर, पुणे - 411002

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, मुंबई

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, मुंबई

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०९.२०२६</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.०८.२०२४ | २४.०७.२०२४<br>१२.०८.२०२४ | २७.०९.२०२४ | -- |

अपिलार्थीनी दाखल केलेल्या मूळ **जोडपत्र अ** नुसार सार्वजनिक बांधकाम विभाग येथील एकात्मिकृत घटक यांचे कार्यालयात सन २०२१ ते २०२४ या कालावधीत पुरेसे मनुष्यबळ व अपुरा कर्मचारी वर्ग असल्याबाबत व कर्मचारी उपलब्ध नसल्याबाबत कार्यालयीन मुख्य अभियंता अधीक्षक अभियंता, राज्यपाल महोदय तसेच माहिती आयुक्त व शासनास केलेल्या सर्व पत्र व्यवहारांच्या प्रती देण्याची विनंती केली असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४/०७/२०२४ व १२/०८/२०२४ रोजी या संदर्भात प्रतिसाद दिलेला आढळून येतो. तसेच मागितलेली माहिती ही विस्तृत व व्यापक असल्याचाही यात प्रतिसाद दिलेला आढळून येतो. त्या विरुद्ध दिनांक २७/०९/२०२४ रोजी प्रथम अपील अर्ज व द्वितीय अपील अर्ज देखील दाखल केलेला असून यावर तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरूपाची व संकलित करण्यासाठी बराच वेळ जाणार असल्याचे नमूद करीत माहितीचे अवलोकन

करण्याबाबत अपिलार्थीना सुचित केलेले आहे. तथापि, मागितलेली माहिती ही अतिशय सामान्य स्वरूपाची असून जाणून बुजून नाकारण्यात येत असल्याबाबत अपिलार्थीनी आज सुनावणीत नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीचा द्वितीय अपील अर्ज अंशतः मंजूर करीत यामध्ये नमूद केलेली माहिती पुढील ७ दिवसात देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल क्र. ७३६८/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

RAHUL BHALCHANDRA PANDE

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA PANDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:Maharashtra State Chief Information Commission Mumbai, o=Maharashtra State Chief Information Commission Mumbai, ou=State Information Commission,
2.5.4.20=211FC8BA99B710538561CE022F16DB877507502E9F09443B2466F775AF4FDB2A, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=1CEAB2634AF0275602A939C8218A713079109F9B806F4EF6C4B02C512873C5C2, cn=RAHUL BHALCHANDRA PANDE
Date: 2026.10.19 12:51:59 +05'30'

**मुंबई** **( राहुल भा.पांडे )**

**दिनांक : २१.०९.२०२६** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**